फक्त सभासदांकरिता                                                                 स्थापना: २९ मे १९६२

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

**डॉ.श्रीम.हेमलता माधव पुरंदरे (लेले) विद्यासंकुल मु.पो.मुटाट,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग: पिन 416803.**
**फोन : ( ०२३६४ ) २४७५२१**

**संचालित**

१. डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट
२. कै. सौ. जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं.) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट
३. डॉ. श्री.र.लेले हायस्कूलची कै. भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे

## ६१ वा
## वार्षिक अहवाल
## आणि
## २०२२-२३
## या वर्षाची हिशेब पत्रके

मुंबई कार्यालय:
कार्याध्यक्ष : श्री. विनायक कृष्णाजी लेले,
१५/ ब, स्वाती, अमृतकुंभ सोसायटी,
चितळे पथ, दादर, मुंबई- ४०००२८.
दूरध्वनी: २३८७६०३६

मुटाट कार्यालय:
मुख्य कार्यवाह : श्री. सुभाषचंद्र गणेश परांजपे
डॉ.श्रीम.हेमलता माधव पुरंदरे (लेले) विद्यासंकुल,
मु.पो.मुटाट,ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग: पिन- ४१६८०३.
दूरध्वनी: ( ०२३६४ ) २४७५२१

**Registration under:**

**संस्था नोंदणी कायदा :**
**21/1860 अन्वये नोंदणी क्र.बिओएम् /63/आर् एन्आर्**
**Societies Registration Act,1860**
**No. BOM/63/RNR**

**मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, 1950**
**अन्वये नोंदणी क्र.एफ् / 2046 (मुंबई),**
**Bombay Public Trust Act, 1950**
**No. F/2046 (Bombay/Mumbai)**

**नोंदणी कार्यालय : मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा: श्री विनायक कृष्णाजी लेले, १५/ब, स्वाती, अमृतकुंभ सोसायटी, चितळे पथ, दादर, मुंबई- ४०००२८.**

**(नोंदणी कार्यालयाचा जुना पत्ता : द्वारा श्री. सुहास चिरपुटकर, मुकुंद भुवन , गावदेवी, मुंबई ४००००७, डिसेंबर २०१७ पासून रद्द करण्यात आला आहे) .**

**PAN : AAATM5432E**

**मंडळास दिलेल्या देणग्या आयकर कलम 80 G खाली, प्रधान आयकर आयुक्तांच्या दिनांक 24 मार्च 2022 च्या आदेशानुसार मुल्यांकन वर्ष 2022-23 ते मुल्यांकन वर्ष 2026-27 या कालावधीसाठी आयकर सवलतीस पात्र आहेत.**
**Donations are Exempted u/s 80 G of Income Tax Act 1961. Order dated 24-03-2022 issued by Principal Commissioner of Income Tax. Valid From AY 2022-23 To AY 2026-27.**

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

**आद्य संस्थापक: कै. डॉ. श्रीधर रघुनाथ लेले**

**विश्वस्त**

**श्री. अनंत श्रीधर लेले     डॉ..दिलीप केशव राणे     श्री. काशिनाथ रत्नोबा पाळेकर**

## कार्यकारी समिती (कार्यकाल: २०२२ ते २०२७)

| अध्यक्ष : श्री. विश्वासराव रामचंद्र पाळेकर | | | |
|---|---|---|---|
| उपाध्यक्ष | श्री. धनंजय गणेश परांजपे, | उपाध्यक्ष | डॉ. हेमलता माधव पुरंदरे |
| कार्याध्यक्ष | श्री. विनायक कृष्णाजी लेले, | कार्योपाध्यक्ष | श्री जितेंद्र मोतीराम साळुंके |
| कार्योपाध्यक्ष | श्री. बळवंत शिवराम राणे | मुख्य कार्यवाह | श्री. सुभाषचंद्र गणेश परांजपे, |
| सह कार्यवाह | श्री. विवेक विष्णु केळकर | सह कार्यवाह | श्री. रघुनाथ रत्नोबा पाळेकर |
| कोषाध्यक्ष | श्री. संजय दत्ताराम टाकळे, | सह कोषाध्यक्ष | सौ. गीता श्रीकृष्ण सोवनी |
| संचालक सभासद | श्री.पांडुरंग बाबला साळुंके | संचालक सभासद | श्री.अरविंद मनोहर ठाकूरदेसाई |
| संचालक सभासद | श्री.बाळकृष्ण रामचंद्र पाळेकर | संचालक सभासद | श्री. चंद्रकांत रामचंद्र घाडी |

## सल्लागार समिती

| | | |
|---|---|---|
| श्री. रमेश अच्युत घाटे | श्री. अच्युत अर्जुन राणे | श्री. मोरेश्वर अनंत गोखले |
| श्री. शिवाजी कृष्णा राणे | श्री. राजेश शांताराम राणे | श्री. विजय महादेव पांगम |
| श्री. किशोर शंकर प्रभू | श्री. रमेश रामचंद्र भिडे | ॲडव्होकेट श्री. रुपेश राणे |

## स्थानिक समिती मुटाट

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरेश दत्ताराम पाळेकर | श्री. रविंद्र भिकाजी प्रभू | श्री. हरिश्चंद्र मधुकर परब |
| श्री. प्रमोद महादेव चव्हाण | सौ. स्मिता अजय मराठे | श्री. शकील लतीफ मुल्ला |
| श्री. विठोबा शंकर प्रभू | श्री. सिताराम कृष्णा प्रभू | श्री. रघुवीर श्रीराम लेले |
| श्री. यशवंत वामन पाळेकर | सौ. मितल मंगेश पाळेकर | श्री. नाऊ सिधू खरात |
| श्री. काशिराम कुशा घाडी | श्री. लक्ष्मण राजाराम पाळेकर | श्री. किरण हरी प्रभू |
| श्री. अमित केशव साळुंके | डॉ. विनय विष्णू केळकर. | श्री. संजय सदाशिव पाळेकर |
| सौ. संजना शशिकांत प्रभू | | |

## स्थानिक समिती मणचे

| | | |
|---|---|---|
| श्री. सुनिल दिनकर धाक्रस | श्री. अलकेश एकनाथ गुरव | श्री. प्रदिप रामचंद्र फाळके |
| श्री. अरविंद भिकाजी घाडी | सौ. सारिका मनेश रहाटे | श्री. सादिक अब्दुल्ला पावसकर |
| श्री. विजय राम देवळेकर | श्री. अजित मधुकर कानेटकर | श्री. गोपिचंद परशुराम कदम |
| श्री. सतीश मोरेश्वर गोखले | | |

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

**ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग**

प्रति: श्रीमती/श्री.

## <u>६१ व्या वार्षिक सर्व साधारण सभेची सूचना</u>

सूचना देण्यात येते की मंडळाच्या सर्व सभासदांची, ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी ठीक ०२.३० वाजता डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट, ता.देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, ४१६८०३, येथे खाली नमूद केलेल्या कामकाजासाठी आयोजित करण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर हजर राहावे अशी विनंती.

## <u>सभेपुढील कामे</u>

१. तारीख २४ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन २०२२-२३ या वर्षाचे मंडळाचे आय-व्यय व तारीख ३१ मार्च २०२३ रोजीचा ताळेबंद तसेच डॉ. श्री.र.लेले हायस्कूल व कै.सौ. जा. शि. राणे कनिष्ठ महाविद्यालयाचे जमाखर्च मंजूर करणे.

३. लेखापरीक्षकांच्या अहवालाचे वाचन करुन त्यात नमूद केलेल्या सुचना-त्रुटींवर चर्चा करुन निर्णय घेणे.

४. तारीख ३१.०३.२०२३ रोजीच्या ताळेबंदातील निधी व स्थावर मालमत्ता खात्याच्या पुनर्रचना करण्याबाबत कार्यकारी समितीच्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

५. सन २०२२-२३ या वर्षाचा मंडळाचा, हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा छापील अहवाल मंजूर करणे.

६. सन २०२३-२४ या वर्षाकरिता हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय आणि मंडळासाठी लेखापरीक्षकांची नेमणूक करणे आणि त्यांची फी व मानधन ठरविणे.

७. सन २०२३-२४ या वर्षाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास विचार विनिमयानंतर मंजूरी देणे.

८. मंडळाच्या आगामी शैक्षणिक उद्दिष्टांबाबत चर्चा करुन सर्वसंमतीने कृती पूरक निर्णय घेणे.

९. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता

मुंबई/मुटाट

तारीख : ३१ ऑगस्ट २०२३

सही-सुभाषचंद्र गणेश परांजपे

मुख्य कार्यवाह

---

**<u>विशेष सूचना:</u>** गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास अशी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी ठीक ०३.०० वाजता भरेल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

**<u>टीप:</u>** हिशेबाबाबत सर्वसाधारण सभेत काही खुलासा पाहिजे असल्यास तशी लेखी विचारणा मुटाट कार्यालयात दिनांक २२ सप्टेंबर २०२३ पर्यंत करावी ही विनंती.

# मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

## ६१ वा वार्षिक अहवाल

**दिनांक १.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३**

सभासद बंधु आणि भगिनींनो,
सविनय नमस्कार,

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचा तारीख १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या वर्षाचा एकसष्ठावा कार्यअहवाल, मंडळाचे लेखापरीक्षण झालेले सन २०२२-२३ या वर्षाचे आयव्यय आणि ३१ मार्च २०२३ रोजीचा ताळेबंद तसेच डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०२२-२३ चे जमाखर्च, कार्यकारी समितीच्यावतीने सभासदांच्या माहितीसाठी आणि वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी सादर करीत आहोत.

सन्माननीय सभासदांच्या माहितीसाठी आणि मंजूरीसाठी, मंडळाचा वार्षिक कार्य अहवाल, डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट या शैक्षणिक आस्थापनांचा, प्राचार्य/मुख्याध्यापक श्री. दिलीप तुकाराम घरपणकर यांनी सादर केलेला सन २०२२-२३ या वर्षाचा संक्षिप्त कार्यवृत्तांत सादर केला आहे.

या कार्यवृत्तांताद्वारे, कार्यकारी समितीने वर्षभरात पूर्ण केलेल्या आणि प्रगतीपथावर असलेल्या विकास कामांचा संक्षिप्त वृत्तांत, लेखापरीक्षण झालेल्या हिशेबांसोबत आपल्यासमोर सादर केला आहे. त्याचबरोबर मंडळाच्या वाटचालीतील दिनांक २ मे ते ४ मे २०२२ या कालावधीत नेत्रदिपक आणि उत्साही वातावरणात साजरा झालेल्या, "हीरक महोत्सव समारोह" च्या सांगता समारोहाचा संस्मरणीय माहितीपट या अहवालात सर्वांच्या माहितीसाठी सादर केला आहे.

कार्यकारी समितीने वर्षभरात, ऑन लाईन सभां आणि प्रत्यक्ष सभांचे आयोजन करुन मंडळाचे कामकाज पार पाडले. हीरक महोत्सव समारोहाचे उत्कृष्टपणे सादरीकरण केले. महत्वाच्या कामांवर लक्ष केंद्रित करुन अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार केले आणि काटेकोर पालन करुन कार्यसिध्दीवर भर दिला. शैक्षणिक आस्थापनातील कामे, शैक्षणिक कामे, प्रशासकीय कामे, नियोजनपूर्वक व्हावीत यासाठी संतुलित नियोजनावर भर देण्यात आल्याने विहित मुदतीत सर्व कामे पार पडून वार्षिक सर्व साधारण सभेचे नियोजनाप्रमाणे आयोजन होत आहे.

**<u>दिवंगत सभासदांचे स्मरण:</u>**

सन २०२२/२३ हा वृत्तांत काळ आणि सन २०२१/२२ हे हीरक महोत्सवी वर्ष, या दोन वर्षांत, मंडळाचे आश्रयदाते : कै. मनोहर गोविंद लेले, कै. विष्णू सखाराम मराठे, कै. डॉ.सौ. शोभा अनंत लेले आणि आजीव सभासद : कै. नरहर पर्शराम लेले, कै. मोरेश्वर गोविंद लेले, कै. अनिल भास्कर परांजपे, कै. श्रीकृष्ण चिंतामण लेले, कै. शांताराम मुरारी पाळेकर, कै.अभिमन्यू गंगाराम पाळेकर, कै. हरीश्चंद्र श्रीधर पाळेकर, कै. सौ. नंदीनी जितेंद्र साळुंके, कै. अतुल अच्युत राणे यांचेसह कै. प्रभाकर सीताराम मणचेकर, डॉ. घन:श्याम भिकाजी काळे आणि कै.सुमन मनोहर ठाकुरदेसाई यांना देवाज्ञा झाली. कार्यकारी समिती, मंडळाच्या सर्व सभासदांच्यावतीने सर्व ज्ञात आणि अज्ञात दिवंगत सभासद आणि हितचिंतकांचे स्मरण करुन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

**<u>अहवाल काळात पूर्ण झालेल्या आणि सुरू असलेल्या विकास कामांची माहिती:</u>**

1. मंडळ उपाध्यक्ष श्री धनंजय गणेश परांजपे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मा. खासदार श्री विनायकराव राऊत, यांचेकडून प्राप्त, पांच लाखांच्या खासदार निधीत साडेतीन लाखांच्या स्वनिधीची भर टाकून शासन संमतीने मंडळाने व्यायामशाळा कक्ष बांधला. अहवाल काळात सदर व्यायामशाळेसाठी आवश्यक साहित्य जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडून मिळाल्याने सदर व्यायामशाळेचे प्रत्यक्ष वापरासाठी उद्घाटन, डोंबिवलीतील प्रसिध्द उद्योगपती आणि नामवंत आर्किटेक्ट, माननीय श्री. राजीव मधुकर तायशेटे आणि त्यांच्या पत्नी समाजसेविका सौ. रचना राजीव तायशेटे यांचे शुभहस्ते दिनांक 06 ऑगस्ट 2022 रोजी करण्यात आले. मा. श्री. तन्मय विजय पांगम यांनी दिलेल्या देणगीतून व्यायमशाळेतील आरसा व अन्य सुविधांचे त्यांचेहस्ते शालार्पण करण्यात आले. खासदार निधीतून दिलेल्या देणगीसाठी मा. खासदार विनायकजी राऊत यांचे मंडळ सदैव आभारी राहील.

2. मुटाट आणि मणचे येथिल हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय इमारतींमधील पावसाळी पाणीगळती थांबविण्यासाठी आवश्यक दुरुस्ती आणि संरक्षक शेडचे काम हीरक महोत्सवापूर्वी करण्यात आले.

3. मुटाट आणि मणचे येथिल हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय इमारतींचे रंगकाम, संकुल परिसराची साफसफाई, बागेची सफाई, पिण्याचे पाणी शुध्दीकरण यंत्रणा आणि कूलरची सोय करण्यात आली. नळाचे पाणी पूर्ण संकुलात तसेच स्वच्छतागृहात फिरविण्यात आले.

4. डॉ.श्रीम.हेमलता माधव पुरंदरे (लेले) विद्यासंकुलात, डॉ. हेमलता माधव पुरंदरे यांच्या पूर्ण खर्च देणगीतून, डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, कै. सौ. जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय संकुलाची पूर्ण वीज गरज भागेल येवढ्या क्षमतेची औष्णिक वीज निर्माण यंत्रणा (SOLAR SYSTEM) हीरक महोत्सवानिमित्त कार्यान्वित करण्यात आली.

**विशेष सूचना:** नवीन सभासद होण्यासाठी मंडळाकडे प्राप्त झालेले अर्ज, मंडळाच्या पुनरचित घटना नियमांना धर्मादाय आयुक्त कार्यालयाची मंजूरी-मान्यता मिळेपर्यंत स्थगित ठेवण्यात आले आहेत. मा. धर्मादाय आयुक्तांच्या मंजूरीनंतर नवीन सभासदत्व देण्याचे काम सुरु होईल.

**अर्थसंचय:**

वृत्तांत वर्षामध्ये मंडळाचे विविध शैक्षणिक उपक्रम, पारितोषिके आणि शिष्यवृत्त्यां, सामान्य निधी, पोषण आहार कक्ष सजावट, खासदार विकासनिधीतून व्यायामशाळा बांधकाम, डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयामधील विकास कामांसाठी तसेच अन्य विधायक सुविधांसाठी ३१ मार्च २०२३ पर्यंत अनेक दानशूर व्यक्तींकडून आणि संस्थांकडून मंडळास देणग्यांद्वारे आर्थिक सहाय्य मिळाले. आम्ही त्या सर्व दात्यांचे आभारी आहोत. प्रमुख देणग्यांचा तपशील पुढीलप्रमाणे:

| देणगीदाराचे नांव : | देणगी उद्देश | देणगी रक्कम (रु) |
|---|---|---|
| 1. श्री. शशिकांत पर्शुराम घाटे | सामान्य निधी | 20,000/- |
| 2. ॲडव्होकेट प्रभाकर राजाराम पेंढारकर | शैक्षणिक निधी | 25,000/- |
| 4. श्री. विनायक कृष्णाजी लेले | सामान्य निधी | 50,000/- |
| 5. श्री. विनायक कृष्णाजी लेले आणि परिवार | सामान्य निधी | 1,00,000/- |
| 6. श्री. प्रभाकर विनायक जोशी | शैक्षणिक निधी | 15, 000/- |
| 7. बृहन्मुंबई लायसन्स प्लंबर्स असोसिएशन, | आर्थिक मागास विध्यार्थ्यांसाठी मदत | 28,000/- |
| 8. श्री. विवेक विष्णु केळकर | विकास कामांसाठी | 10,000/- |

**अन्य उत्पन्न:**

डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलच्या आवारातील हापूस आंब्यांच्या विक्रीतून दरवर्षी काही रक्कमेचे उत्पन्न मंडळास मिळते.

**खर्चाच्या बाबी:**

मंडळाच्या ठळक उत्पन्नाच्या बाबींचा वर उल्लेख केला आहे. आता मंडळाच्या खर्चाच्या बाबींकडे वळतो.

डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, कै. भाऊसाहेब काळे भागशाळा आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालातील गुणवंत विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक, कला-क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व, व्यक्तिमत्व विकास, विविध स्पर्धा परीक्षा, विविध प्रदर्शने यातील गुणवत्तापूर्ण यशप्राप्तीसाठी गुणगौरव पारितोषिके तसेच हुशार आणि गरजू विध्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या प्रदान करण्यासाठी सन्माननीय देणगीदारांनी मंडळास देणग्या दिल्या आहेत. या देणग्यांच्या गुंतवणुकीवरील व्याजातून अहवाल काळात वितरण केलेली पारितोषिके आणि शिष्यवृत्त्या पुढीलप्रमाणे:

डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलमधून शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या गरीब व होतकरु गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षण खर्चासाठी सन २०२२-२३ या वर्षामध्ये पुढीलप्रमाणे शिष्यवृत्यांचे वितरण केले गेले.

| | |
|---|---|
| १. कै.गणेश अनंत सोवनी शिष्यवृत्ती | रु.२५००.०० |
| २. कै.रामचंद्र विष्णु लेले व कै.सीताबाई रामचंद्र लेले शिष्यवृत्ती | रु. ५५०.०० |
| ३. श्री.शंकर गोविंद लेले व सौ.सुमती शंकर लेले शिष्यवृत्ती | रु. ५००.०० |
| ४. कै.सौ. शारदा कृष्णा राणे शिष्यवृत्ती | रु. ५००.०० |
| ५. कै.भिकाजी ऊर्फ दादा चिरपुटकर शिष्यवृत्ती | रु. ५००.०० |
| ६. कै.कृष्णा सिताराम राणे स्मृती शिष्यवृत्ती | रु.१,०००.०० |

वरील शिष्यवृत्त्यांसह सन २०२१-२२ मधील गुणवंत विद्यार्थ्यांना विविध विषयांतील वार्षिक परीक्षेतील उल्लेखनीय यश तसेच क्रीडा, वक्तृत्व व विविध स्पर्धात्मक परीक्षेतील उल्लेखनीय यश प्राप्तीबद्दल दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजी पार पडलेल्या पारितोषिक वितरण समारंभांत रोख रकमेची पारितोषिके वितरीत करण्यात आली.

**शिक्षणसेवक आणि संगणक शिक्षणासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या मानधनाचा खर्च:**

मंडळाने सन २०२२-२३ वर्षामध्ये नियुक्त केलेल्या शिक्षणसेवकांच्या तसेच संगणक आय.सी.टी.निर्देशकाच्या संपूर्ण मानधनाचा खर्च सुमारे ६,६५,०००/- रुपये मंडळाने स्वयं-अर्थसहाय्य मिळवून केला. शैक्षणिक उद्दिष्टांच्या अंमलबजावणीसाठी होणारा खर्च वाढता असून तो भागविण्यासाठी कार्यकारी समितीने सामान्य (कायमस्वरुपी) निधी आणि शैक्षणिक निधी उभारण्यास सुरुवात केली आहे. मंडळावर सन्माननीय देणगीदारांचा लोभ असल्याने निधी तुटवडा भासत नाही. तरीही सर्व सभासद बंधु-भगिनीं यांना, सामान्य व

शैक्षणिक निधीसाठी त्याचप्रमाणे हायस्कूल, भागशाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय इमारतींची देखभाल, दुरुस्ती आणि नुतनीकरणासाठी वैयक्तिक देणग्या द्याव्यात व आप्तजनांकडून देणग्यां मिळवाव्यात असे नम्र आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे.

**<u>पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहसंमेलन २०२२-२३:</u>** शुक्रवार दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजी मंडळाचा पारितोषिक वितरण समारंभ, मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वासराव पाळेकर यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. सल्लागार श्री. विजय पांगम, उपाध्यक्ष श्री. धनंजय परांजपे, उपाध्यक्ष श्री. शिवाजी राणे, मुख्य कार्यवाह श्री. सुभाषचंद्र परांजपे, कार्योपाध्यक्ष श्री. जितेंद्र साळुंके, सहकोषाध्यक्ष डॉ. विनय केळकर, सहकार्यवाह श्री. रघुनाथ पाळेकर, सभासद सौ. गीता सोवनी आणि श्री. अरविंद ठाकुरदेसाई यांच्यासह सल्लागार श्री. बाळकृष्ण पाळेकर, डॉ.दिलिप पाळेकर आणि स्थानिक समिती सदस्य उपस्थित होते.

शनिवार दिनांक २४ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ठीक १०. ०० वाजता, मंडळाच्या सन 2022 ते 2027 या कार्यकालावधीसाठी बिनविरोध झालेल्या नवीन कार्यकारी समिती निवडीचा निकाल निवडणुक अधिकारी श्री. जयंत आत्माराम परांजपे यांनी जाहीर केला. याप्रसंगी मंडळाचे सुमारे 100 सभासद हजर होते.

शनिवार दिनांक २४ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी ठीक २.३० वाजता कार्यकाल संपलेल्या कार्यकारी समितीची आणि नव्याने निवड झालेल्या कार्यकारी समितीची संयुक्त सभा पार पडली. नव्याने निवड झालेल्या कार्यकारी समितीने कार्यकाल संपलेल्या कार्यकारी kसमितीकडून कार्यभार आणि दप्तर स्वीकृती देत त्यांना साभार निरोप दिला. त्यानंतर नवीन कार्यकारी समितीने पुढीलप्रमाणे कार्यकारी समिती पदनिशचितीस व स्वीकृत सभासदांच्या निवडीस सर्वानुमते मंजूरी-मान्यता दिली.

१. अध्यक्ष : श्री. विश्वासराव रामचंद्र पाळेकर
२. उपाध्यक्ष : श्री. धनंजय गणेश परांजपे
३. उपाध्यक्ष : डॉ. हेमलता माधव पुरंदरे
४. कार्याध्यक्ष : श्री. विनायक कृष्णाजी लेले
५. कार्योपाध्यक्ष : श्री. जितेंद्र मोतीराम साळुंके
६. कार्योपाध्यक्ष : श्री. बळवंत शिवराम राणे
७. मुख्य कार्यवाह : श्री. सुभाषचंद्र गणेश परांजपे
८. सह कार्यवाह : श्री. विवेक विष्णु केळकर
९. सह कार्यवाह : श्री. रघुनाथ रत्नोबा पाळेकर
१०. कोषाध्यक्ष : श्री. संजय दत्ताराम टाकळे
११. सह कोषाध्यक्ष : सौ. गीता श्रीकृष्ण सोवनी
१२. स्वीकृत सदस्य : श्री.अरविंद मनोहर ठाकूरदेसाई
१३. स्वीकृत सदस्य : श्री. पांडुरंग बाबल्या साळुंके
१४. स्वीकृत सदस्य : श्री. बाळकृष्ण रामचंद्र पाळेकर
१५. स्वीकृत सदस्य : श्री. चंद्रकांत रामचंद्र घाडी

याच सभेने स्थानिक समिती मुटाट आणि स्थानिक समिती मणचे तसेच सल्लागार समितीच्या पुनर्रचनेसंबंधी विचार करुन मंडळ सभासदांतून काही नांवे निश्चित करुन त्यांच्यांकडून संमती होकार मिळविण्यासाठी पत्रव्यहार करण्याच्या सूचना मुख्य कार्यवाह यांस देत अंतिम निवड कार्यकारी समितीच्या पुढील सभेत जाहीर करावी असा निर्णय घेतला.

सभासद बंधु आणि भगिनिनो! डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, कै.भाऊसाहेब काळे भागशाळेसह आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य-मुख्याध्यापकांचा स्वतंत्र कार्य अहवाल सोबत जोडलेला आहे. या अहवालात सन्माननीय सभासदांना शैक्षणिक आस्थापनातील विध्यार्थ्यांच्या वर्षभरातील अभ्यासाच्या प्रगतीबद्दल तसेच अन्य उपक्रमांबद्दल उपयुक्त माहिती मिळावी याची दक्षता घेतली आहे.

**<u>कार्यकारी समितीच्या सभा:</u>** वृत्तांत वर्षांमध्ये १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत कार्यकारी समितीच्या एकूण ७ सभां पार पडल्या. या सभांना सरासरी ७८ टक्के इतकी उपस्थिती होती. कार्यकारी समितीच्या प्रत्येक सभेमध्ये मंडळाच्या अंगिकृत उपक्रमांच्या कामकाजावर समग्र चर्चा होऊन विनिमयानंतर विषयवार निर्णय सर्व संमतीने घेण्यात आले.

**<u>वार्षिक सर्वसाधारण सभा</u> :** मंडळाच्या सर्व सभासदांची ६० वी (साठावी) वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २४ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ११. ०० वाजता डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट, येथे आयोजित करण्यात आली होती. सभेस मंडळाचे एकूण २५ सभासद हजर होते. सभेचे अध्यक्षस्थान, अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर यानी भूषविले.

मुख्य कार्यवाह श्री सुभाषचंद्र परांजपे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सभेच्या सुरुवातीला, सन २०२१-२२ या वर्षात मंडळाच्या दिवंगत सभासदांना दोन मिनिटे उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

वार्षिक सर्वसाधारण सभेने सर्वानुमते, ७९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास मान्यता दिली. लेखापरीक्षण झालेले सन २०२१-२२ या वर्षाचे मंडळाचे आयव्यय, ३१ मार्च २०२२ रोजीचा ताळेबंद, हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे जमाखर्च मंजुर केले. मंडळ, डॉ.श्री.र.लेले हायस्कूल आणि कै. सौ.जा.शि.राणे कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या कार्य अहवालास मंजुरी दिली. २०२२/२३ वर्षाकरिता मंडळाचे सनदी लेखापरीक्षक म्हणून मे. परांजपे अँड असोशिएटस चे श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊंटंट यांच्या नेमणूकीचा ठराव मंजूर केला. सन २०२२ -२३ साठी रु. ३०,०२,६२६/- ( रुपये तीस लाख दोन हजार सहाशे सव्वीस मात्र) रकमेच्या अंदाजपत्रकास मान्यता दिली. मुख्य कार्यवाह यांनी हीरक महोत्सवाच्या जमा-खर्चाची सभेला माहिती देत जाहीरातीं आणि देणग्यांच्या माध्यमातून एकूण रू. ८,५२,०२७/- (रू. आठ लाख बावन्न हजार सत्तावीस मात्र) एवढी रक्कम जमा आणि एकूण रू. ३,५५,४८७/- (रू. तीन लाख पंचावन्न हजार चारशे सत्त्याऐंशी मात्र ) खर्च झाल्याचे सांगितले. शिल्लक रक्कम रू. ४,९६,५४०/- (रू. चार लाख शहाण्णव हजार पाचशे चाळीस मात्र) मंडळखाती वर्ग करण्याचे ठरले. हीरक महोत्सव समिती बरखास्त करण्यास सभेने मंजुरी दिली.

मंडळाने सिनिअर कॉलेज सुरू केल्यास, खर्चातील खारीचा वाटा उचलण्याचे मत अनेक सभासदांनी व्यक्त केले. तसेच हायस्कुल आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या विना अनुदानित वर्गाना टप्प्याटप्प्याने अनुदान मिळण्यासाठी शासनाकडे मागणी करावी असा ठराव करण्यात आला. दिवंगत विश्वस्त कै. विष्णू सखाराम मराठे यांच्या जागी श्री. काशिनाथ रत्नोबा पाळेकर यांच्या निवडीस सभेने मंजूरी दिली. कार्यकारी समितीची मुदत डिसेंबर २०२२ ला संपत असल्याने सर्व सभासदांनी एकमताने निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यास अनुमती देत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री. जयंत आत्माराम परांजपे यांच्या नियुक्तीस मान्यता दिली. हायस्कूलसाठी ज्यांनी जागा दिली त्यांच्या त्यागाची आठवण म्हणून शाळा परिसरात जमीन दात्यांच्या वाडींची नावे लिहिण्याचे सर्वानुमते ठरले. मंडळाच्या भटवाडी आगर येथील जागेला कंपाऊंड करण्याचे ठरविण्यात आले.

**आभार प्रदर्शन:**

अहवालाचे अखेरीस मंडळाचे सर्व सभासद, हितचिंतक, आजी-माजी विध्यार्थी, मुटाट, मणचे, पाळेकरवाडी, वाघोटण, सडेवाघोटण या पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पालकवर्ग, डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट, कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं.) कनिष्ठ महाविद्यालय मुटाट, डॉ. श्री.र.लेले हायस्कूलची कै.भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे या शैक्षणिक संस्थांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

मंडळाचे लेखापरीक्षक श्री. सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाउंटंट, विश्वस्त श्री. अनंत श्रीधर लेले, डॉ. दिलीप केशव राणे आणि श्री. काशिनाथ रत्नोबा पाळेकर यांचेही नम्रतापूर्वक आभार.

डॉ. श्री.र.लेले हायस्कूल आणि कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं.) कनिष्ठ महाविद्यालय परिसर तसेच कै. भाऊसाहेब काळे भागशाळा येथिल अनेक विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणाऱ्या सर्व ट्रस्टचे, सन्माननीय देणगीदारांचे आणि माजी विध्यार्थ्यांचे नम्रतापूर्वक आभार.

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत हीरक महोत्सव समिती, विशेषाधिकार समिती, मुटाट व मणचे स्थानिक समिती, शाळा समिती आणि शिक्षक पालक संघ या समित्यांतील सर्व सदस्यांचे नम्रतापूर्वक आभार.

अखेरीस, मंडळाच्या संचालन कार्यात महत्वाचा वाटा उचलणारे आमचे मुंबई, मुटाट, पाळेकरवाडी, वाघोटन, सडेवाघोटन आणि मणचे येथिल पदाधिकारी आणि सदस्य तसेच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या सर्व आदरणीय व्यक्तींचे आणि संस्थांचे नम्रतापूर्वक आभार मानून, भावी काळात विध्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, व्यक्तिमत्व विकास आणि कौशल्य विकासास पूरक सुविधा निर्माण करण्याचा मंडळाचा प्रयत्न राहील याची सर्व सभासदांना ग्वाही देत अहवालाची समाप्ती करतो.

**आपले कृपाभिलाषी**

**मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. विश्वासराव रामचंद्र पाळेकर | श्री. विनायक कृष्णाजी लेले | श्री. सुभाषचंद्र गणेश परांजपे | श्री. संजय राजाराम टाकळे |
| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | मुख्य कार्यवाह | कोषाध्यक्ष |

**सुधारीत घटना आणि नियमांनुसार २२ डिसेंबर २०१७ पासून प्रस्तावित बदल**

**मंडळाचे उद्देश:**

१. सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड तालुक्याच्या मुटाट व आसपासच्या भागांतील मुलामुलींच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सोयी पुरविणे.
२. त्याच भागांतील मुलामुलींसाठी कला, शास्त्र, वाणिज्य,अभियांत्रिकी, कृषिविषयक आणि महाविध्यालयीन शिक्षणाच्या सोयी निर्माण करणे.
३. विविध अभ्यासक्रमातील पदविका सुरु करुन व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी पदविका वर्ग सुरु करणे.
४. शाळा आणि महाविद्यालयातील विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा आणि व्यावसायिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविणे आणि उपयुक्त कार्यशाळांचे आयोजन करणे.
५. ग्रामीण उद्योगधंद्यांना उत्तेजन देणारे उपक्रम सुरु करुन विद्यार्थ्यांना मोबदला देणारे व्यावसायिक प्रशिक्षण देणे.

सभासद वर्गणी:

- आधारस्तंभ: रु. २५०००/-
- आश्रयदाते: रु. १००००/-
- हितचिंतक: रु. ५०००/-
- आजीव सभासद: रु. ५००/-

सन्मान्य सभासद: मंडळाच्या कार्याला चालना देणाऱ्या व विशेष कार्यामुळे मंडळाच्या प्रगतीला हातभार लावणाऱ्या व्यक्तींना सन्मान्य सभासदत्व देण्याचा अधिकार कार्यकारी समितीला आहे.

- **बँकर्स**

- आयडीबीआय बँक – दादर
- स्टेट बँक ऑफ इंडिया – देवगड
- विदर्भ कोकण ग्रामीण बँक – मुटाट
- बँक ऑफ महाराष्ट्र- जामसंडे
- सिंधुदुर्ग जिल्हा म.सह.बँक- मणचे

**मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल व कै. भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे आणि कै. सौ. जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय , मुटाट ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग**

# वार्षिक अहवाल 2022-23

शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ तसेच पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ, सर्व विद्यार्थी व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे शाळेच्या विकासात्मक कार्यात भर घालता आली. या सर्वांना प्रथमत: खूप खूप धन्यवाद !

शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मुटाट मध्ये एकूण **327** विद्यार्थी , कै. भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे मध्ये एकूण **101** विद्यार्थी आणि कै. सौ. जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय मुटाट मध्ये इ. 11 वी व 12 वी एकूण **94** विद्यार्थी मिळून एकूण **421** विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

1. **एस. एस. सी. मार्च 202 परीक्षा निकाल** :

मार्च 2022 मध्ये झालेल्या इ. 10 वी च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल मधून 61 विद्यार्थी प्रविष्ठ झाले. त्यापैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी उतीर्ण होऊन निकाल 100% लागला.

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी

| | नाव | प्रतिशत गुण | पत्ता | प्राविण्य |
|---|---|---|---|---|
| 1 | पालेकर उत्तेश उमेश | 84.00% | मु. पालेकरवाडी, पो. मुटाट | प्रथम क्रमांक |
| 2 | प्रभू निषाद संदीप | 81.20% | मु. पो. मुटाट प्रभूवाडी | द्वितीय क्रमांक |
| 3 | कु. परब हर्षाली अनिल | 78.20% | मु. पो. मुटाट , गयाळवाडी | तृतीय क्रमांक |

तसेच कै. भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे मधून 32 विद्यार्थी प्रविष्ठ होऊन त्यापैकी 31 विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

| | नाव | प्रतिशत गुण | पत्ता | प्राविण्य |
|---|---|---|---|---|
| 1 | कु. तनया गणेश पांचाळ | 89.40% | मु. पो. मणचे | प्रथम क्रमांक |
| 2 | विभास विजय ठाकूरदेसाई | 83.60% | मु. पो. मणचे | द्वितीय क्रमांक |
| 3 | कु. सुतार हर्षदा दिलीप | 75.80% | मु. पो. मणचे | तृतीय क्रमांक |

यशवंतराव राणे हायस्कूल बापर्डे या शाळेचे विद्यार्थी आमच्या शाळेतून परीक्षेला प्रविष्ठ झाले. एकूण 30 विद्यार्थी प्रविष्ठ झाले त्यापैकी 29 विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

एकूण शाळेतून 121 विद्यार्थी प्रविष्ठ झाले पैकी 119 विद्यार्थी उतीर्ण झाले.

2. **एच. एस. सी. 2022 परीक्षा निकाल:**

एप्रिल 2022 मध्ये घेण्यात आलेल्या उच्चमाध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी कै. सौ. जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयातून एकूण 67 विद्यार्थी प्रविष्ठ झाले. त्यापैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी उतीर्ण होऊन निकाल 100% लागला.

कला शाखा – 23 विद्यार्थी - पैकी सर्व उतीर्ण , 100% निकाल : गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी –

| | नाव | प्रतिशत गुण | प्राविण्य |
|---|---|---|---|
| 1 | कु. वारीक साक्षी रघुनाथ | 67.83 % | प्रथम |
| 2 | कु. देवळेकर तन्वी संजय | 62.00 % | द्वितीय |
| 3 | कु. देवळेकर सानिका लवू | 58.67 % | तृतीय |

वाणिज्य शाखा- 44 विद्यार्थी – पैकी सर्व उतीर्ण , 100 % निकाल

गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी –

| | नाव | प्रतिशत गुण | प्राविण्य |
|---|---|---|---|
| 1 | कु. वानिवडेकर निता नामदेव | 79.33 % | प्रथम |
| 2 | कु. लाड श्रद्धा रविंद्र | 71.33 % | द्वितीय |
| 3 | कु. कोकरे छाया काळू | 71.00 % | तृतीय |

3. **गणित संबोध परीक्षा** - गणित संबोध परीक्षेला इ. 5 वी व 8 वी तील विद्यार्थी प्रविष्ठ झाले.

4. **शिष्यवृत्ती परीक्षा**-

इ. 5 वी मधून 03 व इ. 8 वी मधून 07 विद्यार्थ्यांनी फॉर्म भरलेले आहेत. .

5. **एन.एम.एम.एस. परीक्षा** – आर्थिक दुर्बल घटकातील मुलांसाठी असणा-या परीक्षेला इ. 8 वी मधून 18 विद्यार्थी परीक्षेला बसले. परवाच परीक्षा पार पडली असून निकाल येणे बाकी आहे.
6. **चित्रकला परीक्षा –** या शैक्षणिक वर्षामध्ये एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा ऑगस्ट 2022 मध्ये घेण्यात आल्या. एलिमेंटरी साठी 14 आणि इंटरमिजिएट परीक्षेला 04 विद्यार्थी प्रविष्ठ झाले.
   तसेच ऑगस्ट 2022 मध्ये माध्य. व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेसाठी विद्यालयातून एकूण 115 विद्यार्थी प्रविष्ठ झाले.
7. **क्रीडा स्पर्धा** – शैक्षणिक वर्ष 2022-23 साठीच्या शासकीय क्रीडा स्पर्धा माहे नोव्हेंबर 2022 पासून सुरू झाल्या. विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी भाग घेऊन घवघवीत यश संपादन केले.
   i. मैदानी स्पर्धा – डिसेंबर 2022 च्या सुरूवातीला झालेल्या विविध मैदानी खेळ प्रकारांमध्ये अनेक मुलांनी आपला सहभाग नोंदविला. पैकी अनेक मुलांनी आपले कौशल्य सिद्ध करून प्रथम / द्वितीय क्रमांक मिळवून जिल्हास्तरासाठी तालुक्याचे प्रतिनिधित्व केले. जवळपास सर्वच क्रीडाप्रकारात मुलांचा सहभाग होता.

***100 मी. धावणे :***

1. लौकीक बाबल्या भेकरे , इ. 8 वी याने 14 वर्षांखालील गटात तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला.

*200 मी धावणे :*

1. लौकीक बाबल्या भेकरे , इ. 8 वी याने 14 वर्षांखालील गटात तालुका स्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला.
2. यश राजन मण्यार , इ. 11 वी याने 17 वर्षांखालील गटात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला.
3. कु. सुकन्या लवू देवळेकर हीने 19 वर्षांखालील गटात तालुकास्तरावर तृतीय क्रमांक मिळवला.

***4 X 100 मी रिले :***

1. या स्पर्धेत आपल्या शाळेच्या मुलींच्या संघाने तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला.

***थाळीफेक :***

1. कु. लाजरी प्रशांत वाडये हीने 14 वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक मिळवला.
2. कु. हर्षाली अनिल परब हीने 17 वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक मिळवला.
3. लोकेश संदेश प्रभू याने 14 वर्षांखालील गटात तृतीय क्रमांक मिळवला .
4. आर्यन संतोष तारी याने 17 वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक मिळवला.

***गोळाफेक :***

1. कु. हर्षाली अनिल परब हीने 17 वर्षांखालील गटात तृतीय क्रमांक मिळवला.
2. आर्यन संतोष तारी याने 17 वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक मिळवला.
3. कु. रसिका राजेंद्र तांबे हीने 17 वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक मिळवला .

***उंचउडी :***

1. तन्मय जितेंद्र पाळेकर याने 14 वर्षांखालील गटात द्वितीय क्रमांक मिळवला.
2. आर्यन रविंद्र पाळेकर याने 17 वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक मिळवला.

***भालाफेक :***

1. कु. हर्षाली अनिल परब हीने 17 वर्षांखालील गटात तृतीय क्रमांक मिळवला.
2. कु. रसिका राजेंद्र तांबे हीने 17 वर्षांखालील गटात द्वितीय क्रमांक मिळवला .

**वरील सर्व खेळाडूंची जिल्हास्तरासाठी निवड झाली.**

**जिल्हास्तरीय स्पर्धा :-**

आर्यन संतोष तारी याने थाळीफेक या क्रीडा प्रकारात जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला. त्याची सातारा येथे होणा-या विभाग स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

सांघीक स्पर्धा :

खो – खो :

शाळेचे 14, 17 व 19 वर्षांखालील मुलींचे तीनही संघ तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरासाठी पात्र झाले. तसेच मुलांचा 19 वर्षांखालील संघ प्रथम क्रमांक प्राप्त करून जिल्हास्तरासाठी पात्र झाला. 17 वर्षांखालील मुलांच्या संघाला द्वितीय क्रमांक मिळाला.

जिल्हास्तरीय खो –खो स्पर्धेत 19 वर्षांखालील मुलींच्या संघाने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. हा संघ सांगली येथे झालेल्या विभागस्तरीय स्पर्धेत चांगली कामगिरी करून आला.

मुलींचे इतर दोन संघ जिल्हास्तरावर उपविजेते ठरले.

सिंधुदुर्ग जिल्हा खो – खो असोसिएशन मार्फत घेतलेल्या निवड चाचणीत आपल्या शाळेतील 4 विद्यार्थिनींची निवड राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी झाली.

**8. विज्ञान प्रदर्शन :**

शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये 49 वे विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले. दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनामध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान उपकरण प्रदर्शनात मांडले. याच प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी वक्तृत्व , निबंध व प्रश्नमंजुषा स्पर्धेत भाग घेतला.

**9. प्रश्नमंजुषा स्पर्धा :**

ऑक्टोबर 2022 मध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक वर्गाने आपला सहभाग नोंदविला.

**10. योगदिन :**

21 जून रोजी योग दिन दरवर्षी शाळेत साजरा केला जातो. यावर्षीही योगाचे महत्व सांगून योगदिन साजरा करण्यात आला.

**11. सरस्वती पूजन :**

उत्साही वातावरणात सरस्वती पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

**12. इ. 11 वी स्वागत समारंभ :**

दरवर्षीप्रमाणे इ. 11 वी मध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांच्या स्वागताचा समारंभ घेण्यात आला. इ. 12 वी च्या विद्यार्थ्यांनी इ. 11 वी च्या विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले. समारंभाला पंचक्रोशीतील अनेक मान्यवर उपस्थित होते.

**13. जयंती कार्यक्रम व पुण्यातिथी कार्यक्रम :**

वर्षभरात अनेक थोर पुरूषांच्या जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम साजरे करण्यात आले. 1 मार्च रोजी आपल्या शाळेचे आद्य संस्थापक डॉ. श्रीधर रघुनाथ लेले यांचा जन्मदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

**14. <u>आभार:</u>**

शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये शाळेसाठी मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ , पालक-शिक्षक संघ , माता-पालक संघ , शिक्षण विभाग , पंचक्रोशीतील ग्रामपंचायती, ग्रामस्थ, कर्मचारी व विद्यार्थी तसेच परिसरातील डॉक्टर मंडळी यांनी खूप सहकार्य केले. या सर्वांचे शाळेच्या वतीने खूप खूप ऋण व्यक्त करतो व शाळेच्या वाटचालीतील सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींना धन्यवाद देतो आणि आभार व्यक्त करतो.

धन्यवाद !

श्री. दिलीप तुकाराम घरपणकर

मुख्याध्यापक

## मंडळाच्या दमदार वाटचालीतील मौलिक क्षण “हीरक महोत्सव सांगता समारोह” दिनांक २ मे ते ४ मे २०२२

सन्माननीय सभासद ! सन २०२१-२२ या हीरक महोत्सवी वर्षात, डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल,कै. सौ. जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय आणि कै. भाऊसाहेब काळे भागशाळेमध्ये कोरोना प्रतिबंधांचे पालन करत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. हीरक महोत्सवी ‘निर्धार’ स्मरणिकेत मंडळ स्थापनेपासून ते ३१ मार्च २०२२ पर्यंतच्या वाटचालीतील महत्वाच्या घटनांचा माहितीपूर्ण, उद्बोधक आणि स्मृती जागविणारा आढावा, सादर करण्यात आला आहे. प्रस्तुत वार्तांकनात दिनांक २ मे ते ४ मे २०२२ या तीन दिवसात साजरा झालेल्या हीरक महोत्सव सांगता समारोहाच्या प्रमुख घटनांचे संक्षिप्त वृत्तांकन, निवडक क्षणचित्रांसह सादर केले आहे.




**हीरक महोत्सव सांगता समारोह शुभारंभ – दिवस पहिला: सोमवार दिनांक २ मे २०२२:**

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ आणि डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलचा दिमाखदार हीरक महोत्सवी सांगता समारोह दिनांक २ मे २०२२ ते ४ मे २०२२ या तीन दिवसात अतिशय उत्साहाने आणि आनंदात पार पडला. मंडळाच्या वाटचालीतील साठावा मैलाचा दगड आणि कार्यपूर्तीचा हिरेजडीत टप्पा अशी या सोहळ्याची नोंद व्हावी असे सुनियोजित आयोजन करण्यात आले होते. वर्षभरातील विविध उपक्रमांसह, हीरक महोत्सव समारोपाच्या सुनियोजित सादरीकरणाचे शिवधनुष्य “हीरक महोत्सव समितीने” लिलया पेलले यासाठी हीरक महोत्सव समितीचे अध्यक्ष श्री. बळवंतराव शिवराम राणे, उपाध्यक्ष श्री. भास्कर अनंत पाळेकर, उपाध्यक्ष डॉ. दिलीप पांडुरंग पाळेकर, उपाध्यक्ष डॉ. अमोल जनार्दन तेली, सचिव श्री. रमेश कविटकर सर, खजिनदार श्री. रघुनाथ रत्नोबा पाळेकर, सर्व सल्लागार, पदाधिकारी आणि सभासदांचे आभार मानून सांगता समारोहाचे वार्तांकन सुरु करतो.




हीरक महोत्सवी सांगता सोहळ्याच्या प्रथम दिवसाचा शुभारंभ सकाळी ८.३० पासून निमंत्रित मान्यवरांचे स्वागत, विध्यार्थी मानवंदना, बँडपथक, मुख्याध्यापक आणि शिक्षक वर्गाकडून आदरातिथ्य असे उत्साही वातावरणात झाले. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवन व स्वागत गीताने झाली. मा. श्री. विश्वासराव पाळेकर, अध्यक्ष, मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, प्रमुख पाहुणे मा.श्री. शरदराव उत्तम शेटे, सहाय्यक प्राध्यापक, श्रीम. न. शां. पंतवालावलकर कनिष्ठ महाविद्यालय, देवगड, मा.श्री.अशोक मनोहर देसाई, सर कार्यवाह,

अखिल कुंभवडे ग्राम विकास मंडळ आणि मा.श्री. बाबुराव वामनराव राणे, अध्यक्ष, श्रीपावणादेवी कृपा शिक्षण विकास मंडळ, बापर्डे, मा.डॉ. मीरा पिंपळस्कर,M.Sc.Ph.D. आणि मा. डॉ. प्रसाद रमेश भिडे, MA.Ph.D, या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन, देवी सरस्वती व संस्थापक डॉ. श्रीधर रघुनाथ लेले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन सांगता समारोहाचा शुभारंभ झाला. मुख्याध्यापक श्री. दिलीप घरपणकर आणि सहकारी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी व्यासपीठावरील आणि सभामंडपातील मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन अगत्यपूर्वक स्वागत केले.




"निर्धार" या हीरक महोत्सवी स्मरणिकेचे प्रकाशन करतांना सर्व मान्यवर:




यानंतर प्रमुख पाहुणे मा.श्री. शरदराव शेटे, सहाय्यक प्राध्यापक, सन्मा.पाहुणे मा.श्री.अशोक देसाई, मा.श्री. बाबुराव राणे, मा.डॉ. मीरा पिंपळस्कर, M.Sc.Ph.D., मा. डॉ. प्रसाद रमेश भिडे, MA.Ph.D, अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर, उपाध्यक्ष श्री. शिवाजीराव राणे, उपाध्यक्ष श्री. धनंजय परांजपे, हीरक महोत्सव समिती अध्यक्ष श्री. बळवंतराव राणे, कार्योपाध्यक्ष श्री. जितेंद्र साळुंके, मुख्य कार्यवाह श्री. सुभाषचंद्र परांजपे, सह कार्यवाह श्री. विवेक केळकर, कोषाध्यक्ष श्री. संजय टाकळे, डॉ. हेमलता पुरंदरे, श्रीमती सविता फणसळकर, सौ.गीता सोवनी, श्री. रमेश भिडे, डॉ. दिलीप पाळेकर, श्री. विलास साळुंके, श्री. अच्युतराव राणे, श्री. राजेश राणे, मुख्याध्यापक श्री. दिलीप घरपणकर इत्यादि मान्यवरांच्या उपस्थितीत आणि टाळ्यांच्या गजरात मंडळाच्या "निर्धार" या हीरक महोत्सवी स्मरणिकेच्या प्रकाशनाचा सोहळा पार पडला. त्यासोबत मान्यवरांच्या शुभहस्ते हीरक महोत्सवी स्मृती चिन्हाचे अनावरण करण्यात आले.

उपस्थित मान्यवरांचा आदरपूर्वक शाल, गुलाबपुष्प, निर्धार स्मरणिका आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच हीरक महोत्सव समारंभाचे औचित्य साधून मंडळाच्या कामकाजात महत्वपूर्ण योगदान देत भरीव कार्य करणाऱ्या श्री.शिवाजी राणे, श्री.धनंजय परांजपे, डॉ.हेमलता पुरंदरे, श्री. सुभाषचंद्र परांजपे, श्री. अच्युतराव राणे या मान्यवरांचे शाल, गुलाबपुष्प, निर्धार स्मरणिका आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आले. मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. रमेशराव घाटे, जेष्ठ पदाधिकारी श्री. प्रभाकर परांजपे हे वयपरत्वे समारंभास हजर राहू शकले नसल्याने त्यांचा सत्कार नंतर मुंबईत करण्याचे ठरले. मंडळाचे मणचेतील मुख्य आधारस्तंभ श्री. बापुसाहेब गोखले यांचा मणचे येथे दुपारच्या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

हीरक महोत्सवाच्या मुहुर्तावर कार्यालयात, मंडळाच्या स्थापनेपासून ते हीरक महोत्सवापर्यंत आपल्या कार्यकर्तृत्वाने मंडळ संवर्धन, शैक्षणिक उद्दिष्टांची कार्यवाही, शैक्षणिक विस्तार आणि भावी कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण करत संस्मरणीय कार्य करणाऱ्या महनीय मान्यवरांच्या प्रतिमा/तस्वीरींचे मा. अध्यक्षांचे हस्ते, कार्यकारी समिती पदाधिकारी आणि सन्माननीय पाहुण्यांच्या उपस्थितीत, टाळ्यांच्या गजरात अनावरण करण्यात आले.

डॉ. हेमलता मा. पुरंदरे (लेले) विद्या संकुलातील, सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे, डॉ. हेमलता पुरंदरे यांचे हस्ते शालार्पण करतांना:




डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल परिसराची वीज गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प डॉ. हेमलता पुरंदरे आणि कुटुंबीय यांनी संपूर्ण खर्चाने उभारून दिला. या प्रकल्पाचे डॉ. हेमलता पुरंदरे यांचे हस्ते शालार्पण करण्यात आले. त्याचबरोबर हायस्कूलच्या एस.एस.सी २००१ च्या बॅचने हायस्कूलची एक वर्गखोली डिजिटल केली त्या कक्षाचे त्या बॅचच्या प्रमुख विध्यार्थ्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे आणि व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते हीरक महोत्सवी वर्षात मंडळास देणग्या प्रदान करणाऱ्या प्रमुख देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. तसेच हीरक महोत्सवानिमित्त वर्षभरात ज्या स्पर्धा पार पडल्या त्यातील विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

प्रमुख पाहुणे मा.श्री. शरदराव उत्तम शेटे यांनी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक आणि हीरक महोत्सवाच्या प्रमुख सोहळ्यास अनुलक्षून ओघवत्या शैलीत उद्बोधक विचार मांडले. सन्माननीय पाहुणे मा. श्री. अशोक मनोहर देसाई, यांनी विध्यार्थ्यांस स्वानुभवाचे हलके फुलके दाखले देत, टाळ्यांच्या गजरात मौलिक मार्गदर्शन केले. मा. श्री. बाबुराव वामनराव राणे, यांनी मुटाट आणि बापर्डे यांचा ऋणानुबंध आणि शेजारधर्म यावर छान भाष्य करीत, हायस्कूलचा नयनरम्य परिसर, एकमेकांचे सहकार्य आणि सर्वसंबंधितांचा भक्कम आधार यामुळे संस्था उद्दिष्टांची निश्चित पूर्ती करेल अशी शुभेच्छा व्यक्त केली. डॉ.हेमलता पुरंदरे यांनी वंश अनुवंश या वैद्यकीय दृष्ट्या सामान्यांना गहन वाटणाऱ्या परंतु महत्वाच्या विषयाची सुलभपणे ओळख करुन दिली. महिलांचे सबलीकरण आणि त्यांचा सर्व क्षेत्रातील वाढता सहभाग देशासाठी मोलाचा असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. मीरा पिंपळस्कर यांनी सन १९५०-६० च्या दशकातील आठवणी सांगून कै. बाबासाहेब चिरपुटकर आणि डॉ. श्रीधर रघुनाथ लेले यांच्या उदात्त कार्याबद्दलची उपयुक्त माहिती दिली. डॉ. प्रसाद भिडे हे नवीन पिढीचे प्रतिनिधी असूनही बालपणी त्यांनी मुटाटला दिलेल्या भेटींची रंजक माहिती विध्यार्थ्यांना दिली. संस्कृत अध्यापनाबाबत संस्था विचार करणार असेल तर सर्व सहकार्य करण्याचे त्यांनी सुचित केले. एक्याण्णव वर्षांच्या श्रीमती सविता फणसळकर (चिरपुटकर) यांनीही विध्यार्थ्यांना लहानपणीच्या रम्य आठवणी सांगितल्या.




वरीलप्रमाणे रंजक, रंगतदार कार्यक्रम आटोपता घेताना, हीरक महोत्सव समिती अध्यक्ष श्री.बळवंतराव राणे आणि अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर यांनी समयोचित संक्षिप्त विचार व्यक्त केले आणि आभार प्रदर्शनाने सकाळच्या सत्राचा कार्यक्रम पार पडला. सूत्रसंचालन श्री. चेतन पाळेकर आणि श्री. केशव परांजपे यांनी केले. यानंतर निमंत्रित पाहुणे, विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थांच्या सहभोजनाचा कार्यक्रम पार पडला.

दुपारच्या सत्रात, कै.भाऊसाहेब काळे भागशाळा मणचे, येथे भागशाळेसाठी विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर, सन्माननीय पाहुणे श्री अशोक देसाई, उपाध्यक्ष श्री. शिवाजी राणे, उपाध्यक्ष श्री. धनंजय परांजपे, मुख्य कार्यवाह श्री सुभाषचंद्र परांजपे, कोषाध्यक्ष श्री. संजय टाकळे, सहकार्यवाह श्री रघुनाथ पाळेकर, सदस्य श्री. अरविंद ठाकूरदेसाई तसेच इतर मंडळ पदाधिकारी, मुटाट व मणचे स्थानिक समितीचे सदस्य, मणचे गावचे सरपंच, मुख्याध्यापक, सहाय्यक शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांचे सहाय्यक शिक्षिका सौ. मृणाल कोयंडे यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. श्री बापूसाहेब गोखले यांचा शाल, श्रीफळ, निर्धार स्मरणिका आणि स्मृतिचिन्ह देऊन अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर, यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मा. श्री.अरविंद ठाकूरदेसाई यांचाही शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मणचे भागशाळेसाठी प्रमुख देणग्या देणाऱ्यातील श्री. आदित्य अरविंद ठाकूरदेसाई, श्री. मोरेश्वर (बापूसाहेब) गोखले, श्रीम. स्नेहल मुकुंद ठाकूरदेसाई, सौ.श्रध्दा परेशानंद कुलकर्णी (लिमये) श्री. धोंडी रामचंद्र जोशी, श्री. सुनिल यशवंत इस्वलकर, श्री. हेमंत वसंत गोखले यांचेसह कै. भाऊसाहेब काळे भागशाळेतून सेवानिवृत्त झालेले श्री. दिलीप यशवंत लेले आणि सौ. श्रध्दा शंकर पराडकर व इतर देणगीदारांचा संस्था पदाधिकाऱ्यांच्या हस्ते गुलाबपुष्प, स्मरणिका आणि स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

मणचे स्थानिक समिती सदस्य आणि ग्रामस्थांनी आपले विचार व्यक्त केले. सन्माननीय पाहुणे श्री. अशोक देसाई यांनी कै. भाऊसाहेब काळे भागशाळेचे विध्यार्थ्यांना त्यांच्या खुमासदार शैलीत भाषण करुन मार्गदर्शन केले. काही ग्रामस्थांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर यांनी सांगितले की, कै. भाऊसाहेब काळे भागशाळा ही मंडळाची विस्तार शाखा असून मंडळाच्या वाटचालीत भागशाळेला महत्व आहे. मणचेकर ग्रामस्थांनी हीरक महोत्सवाचे औचित्य साधून मणचे भागशाळेसाठी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि विध्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन मणचे येथे सुरु केल्यास मंडळ त्यास प्रोत्साहन देईल. कार्यक्रम समाप्तीनंतर भागशाळेत चालू असलेल्या विकास कामांची कार्यकारी समिती पदाधिकाऱ्यांनी पाहाणी केली.






रात्रीच्या सत्रात डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलच्या रंगमंचावर रात्रौ ठीक ९.३० वाजता " मी आणि डॉ. काशिनाथ घाणेकर" हा उत्तम, अभिरुची संपन्न एकपात्री कार्यक्रम आपल्या हायस्कूलचे माजी विध्यार्थी आणि नामवंत अभिनेते श्री. रमेश रामचंद्र भिडे यांनी प्रेक्षकांचा उस्फुर्त प्रतिसाद घेत आणि टाळ्यांच्या गजरात सादर केला. श्री. रमेश भिडे यांनी त्यांच्या समवयस्क स्नेह्यांचा ह्द्य सत्कार केला. एकंदरीत कथनात्मक आणि अभिनयाची जुगलबंदी असलेला हा एकपात्री नाट्यप्रयोग शेवटपर्यंत प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेत बहारदार रंगला.

**<u>हीरक महोत्सव सांगता समारोह सोहळा- दिवस दुसरा मंगळवार दिनांक ३ मे २०२२:</u>**

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवन व स्वागत गीताने झाली. या कार्यक्रमास अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर, हीरक महोत्सव समिती अध्यक्ष श्री. बळवंतराव राणे, यांचेसह प्रमुख पाहुणे म्हणून नामवंत माजी विध्यार्थी मा.ॲड. श्री. रुपेशजी राणे, मा. श्री. विलास कृष्णा साळुंके, संचालक- द.म्युनि.को.ऑप.बँक लि. मुंबई, मा. श्री. रविंद्र सहदेव पेडणेकर, राष्ट्रीय शरीर सौष्टव पटू , श्री. अशोक देसाई, श्री. अरुण मिराशी, श्री. प्रभाकर विनायक जोशी, श्री. शशिकांत घाटे, श्री. बाळकृष्ण पाळेकर, श्री. सुनिल गुरव, श्री. वसंत आपटे, श्री अंकुश मोंडे, संस्था पदाधिकारी सर्वश्री सुभाषचंद्र परांजपे, रघुनाथ पाळेकर, संजय टाकळे, जितेंद्र साळुंके, डॉ. विनय केळकर, सौ. गीता सोवनी, सौ. अमृता परांजपे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती लाभली. मान्यवरांनी दीप प्रज्वलन करुन देवी सरस्वती व डॉ. श्री. र. लेले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. मुख्याध्यापक श्री. दिलीप घरपणकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यासपीठावरील तसेच सभामंडपातील मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन अगत्यपूर्वक स्वागत केले.






हीरक महोत्सवाचा दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम हा प्रामुख्याने कार्य-गौरव सोहळ्याचा होता. या कार्यक्रमात संस्था हितार्थ उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्ती, प्रमुख देणगीदार, प्रमुख जाहिरातदार आणि माजी विध्यार्थी यांचा गुणगौरव आणि सत्कार करण्यासाठी नियोजित होता. कार्यक्रमारंभी कनिष्ठ महाविद्यालय इमारतीच्या गच्चीवर नव्याने बांधलेल्या पाणी गळती प्रतिरोधक शेडचे अध्यक्ष श्री विश्वासराव पाळेकर यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. हीरक महोत्सवाच्या मुहुर्तावर विद्या संकुल बागेत नारळाच्या रोपट्याचे वृक्षारोपण करण्यात आले. त्याच बरोबर सन्माननीय पाहुणे श्री. अशोक देसाई यांचेकडून देणगीरुपाने मिळालेल्या अनुक्रमे वाचनालय आणि मंडळ ऑफिसमधील कपाटांचे त्यांच्या शुभहस्ते शालार्पण करण्यात आले.

यानंतर प्रमुख देणगीदार, जाहिरातदार आणि हितचिंतकांचा शाल, गुलाबपुष्प, स्मरणिका आणि स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. हीरक महोत्सवासाठी उल्लेखनीय कार्य करणारे सर्वश्री बळवंतराव राणे, शिवाजी राणे, धनंजय परांजपे, सुभाषचंद्र परांजपे, संजय टाकळे, विवेक केळकर, विनय केळकर, जितेंद्र साळुंके, रघुनाथ पाळेकर, अरविंद ठाकूरदेसाई, सौ. गीता सोवनी व सौ. अमृता परांजपे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर सर्वश्री किरण प्रभू,अच्युतराव राणे,राजेश राणे, बाळकृष्ण पाळेकर, सुर्यकांत साळुंके, विठोबा प्रभू, श्रीकृष्ण सोवनी,चंद्रकांत घाडी, प्रमोद चव्हाण,चंद्रकांत पाळेकर यांचेसह मंडळाचे अनेक आजी-माजी सभासद, ग्रामस्थ, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, हीरक महोत्सव समिती सदस्य, माजी विद्यार्थी यांचा गुलाबपुष्प, स्मरणिका आणि स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. दिलीप घरपणकर, सहाय्यक शिक्षक सर्वश्री चेतन पाळेकर, तन्मय कोठावळे, आणि कर्मचारी श्री. विजय ठाकूरदेसाई यांचा खास सत्कार करण्यात आला.










हीरक महोत्सवानिमित्त कर्तव्य तत्पर संस्थानियुक्त शिक्षणसेवक, अध्यापक आणि कर्मचारी कु. निशा विजय पाळेकर, कु. प्रणाली सुरेश रायकर, सौ. गीतांजली अशोक देसाई आणि सर्वश्री शैलेश कृष्णा पाडावे, अजित न्हानू कविटकर, चेतन रघुनाथ पाळेकर, ओंकार भास्कर लेले आणि केशव सुभाषचंद्र परांजपे यांना विशेष पारितोषिक देत गौरविण्यात आले.







प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या मान्यवर नामवंत माजी विध्यार्थ्यांनी त्यांच्या शाळेबद्दलच्या हृद्य आठवणी आणि यशप्राप्तीसाठी घेतलेले कष्ट वर्णन करुन विध्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

अध्यक्षीय भाषणानंतर सकाळच्या सत्रातील या कार्यक्रमाची आभार प्रदर्शनाने सांगता झाली. कार्यक्रमानंतर निमंत्रित पाहुण्यांसह विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांच्या सहभोजनाचा कार्यक्रम पार पडला.







दुपारच्या सत्रात निमंत्रित खुला गट कबड्डी सामने व खो-खो प्रदर्शनीय सामने आयोजित करण्यात आले होते. या क्रीडा सामन्यांनाही चांगला प्रतिसाद लाभल्याने सर्व सामने उत्कंठावर्धक होत उपस्थित मान्यवरांनी आणि प्रेक्षकांनी खेळाडूंचे कौतुक करीत कार्यक्रमात रंगत भरली. सायंकाळी उशीरापर्यंत रंगलेल्या या सामन्यांच्या विजेत्यांना चषक आणि पारितोषिके देण्यात आली.



रात्रौ ठिक ९.३० डॉ. श्रीधर रघुनाथ लेले हायस्कुल, कै. भाऊसाहेब काळे भागशाळा आणि यशवंतराव राणे विध्यामंदिर बापर्डे येथिल विध्यार्थी आणि शिक्षकांनी एकापेक्षा एक बहारदार, मनोरंजक आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत टाळ्यांच्या गजरात सादर केले. सहाय्यक शिक्षक श्री. उदय कदम यांनी सादर केलेला दशावतार नाट्यविष्कार सर्वांना आवडला. पाळेकरवाडी प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री. त्रिंबककर यांनी दिग्दर्शन केलेले विध्यार्थ्यांचे कार्यक्रम उत्कंठावर्धक झाले. एकंदरीत शिक्षक आणि विध्यार्थ्यांच्या मनोरंजन कार्यक्रमांमुळे हीरक महोत्सवाची शोभा वाढली.






**हीरक महोत्सव सांगता समारोह सोहळा दिवस तीसरा : शुक्रवार दिनांक ४ मे २०२२:**

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ठीक ९.३० वाजता सत्यनारायण महापूजेने झाली. महापूजेचे यजमानपद सौ. गीता आणि श्री. श्रीकृष्ण सोवनी यांनी स्वीकारले होते. पूजाविधी आणि महाआरती झाल्यावर ठीक ११.०० वाजता फुड फेस्टीवलचे उद्घाटन अध्यक्ष श्री. विश्वासराव पाळेकर यांनी केले. पंचक्रोशीतील सुमारे १२ गृहिणींनी विविध स्वादिष्ट पाककृती सादर केल्या होत्या. फूड फेस्टीवलमधील पाककृतींचा उपस्थित मान्यवर, विध्यार्थी, शिक्षक तसेच ग्रामस्थांनी मनसोक्त आस्वाद घेतला.












सत्यनारायण महापूजेनंतर सुमधुर भजनांचा कार्यक्रम पार पडला. दुपारी निमंत्रित पाहुणे मंडळी, हीरक महोत्सव कार्यकर्ते आणि संस्था पदाधिकारी यांचा सहभोजनाचा कार्यक्रम पार पडला.

दुपारच्या सत्रात ठीक ३.३० वाजता माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. सुमारे पन्नास माजी विध्यार्थ्यांनी सदर मेळाव्यात सहभागी होत मंडळ संचालन, विध्यार्थ्यांचे हायस्कूल आणि संस्थेविषयींचे विधायक विचार मांडले. भावी काळात अधिकाधिक माजी विध्यार्थ्यांना संस्थेशी जोडून संस्थेच्या विकासात योगदान देण्याचे एकमताने सर्वांनी प्रतिपादन केले. तसेच माजी विध्यार्थी संघाचे स्वतंत्र अस्तित्व राखून त्याद्वारे सर्वांना संपर्क व्यासपीठ मिळवून देण्याचा निश्चय सर्वांनी केला.

सायंकाळी ठीक ४.३० वाजता हीरक महोत्सव समितीची आढावा बैठक सुरु झाली. सन २०२१-२२ या हीरक महोत्सवी वर्षात समितीने पार पाडलेल्या महत्वपूर्ण कार्याचा तपशील सचिव श्री रमेश कविटकर यांनी सभेपुढे ठेवला. हीरक महोत्सव समितीच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी एकदिलाने या सोहळ्याचे काम पार पाडून संस्था आणि डॉ. श्री.र.लेले हायस्कूलच्या लौकिकात भर टाकली आहे अशा शब्दात मंडळ अध्यक्ष श्री पाळेकर यांनी सर्वांचे कौतुक केले. हीरक महोत्सव समितीच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्यांमुळे हीरक महोत्सवाचे संस्मरणीय सादरीकरण आणि समारोप करता आला यासाठी अभिनंदन करीत सर्वांचे हार्दिक आभार मानले.

वरीलप्रमाणे हीरक महोत्सव समिती आढावा बैठकीचे महत्वाचे कामकाज आटोपल्यानंतर मंडळ कार्यालयात सायंकाळी ठीक ५.३० वाजता कार्यकारी समितीची सभा पार पडली.

सन्माननीय सभासद, हितचिंतक, माजी विध्यार्थी, देणगीदार, ग्रामस्थ, शिक्षक, कर्मचारी आणि विध्यार्थ्यांच्या वर्षभरातील सहकार्याने आणि अनंत व्यक्तींच्या सहभागाने हीरक महोत्सव फुलत गेला. अशा या हीरक महोत्सवी महासोहळ्याचा नेत्रदिपक सांगता सोहळा हजारोंच्या उपस्थितीत रात्रौ ठीक ९.३० वाजल्यापासून क्षणोक्षणी उत्कंठावर्धक होत गेलेल्या “ जल्लोष हीरक महोत्सवाचा, सोहळा कला गुणांचा ” या सादरकर्ते शिवप्रेमी पाळेकरवाडी या कलाकार वृंदाने जल्लोषात सादर केलेल्या विविध, कलात्मक आणि मनोरंजन कार्यक्रमाने समारोप झाला. वर्षभरातील सर्व कार्यक्रम आनंदात आणि वेळापत्रकाप्रमाणे पार पडल्याने हीरक महोत्सवाची सांगता संस्मरणीय झाली.

**<u>हीरक महोत्सव – सन २०२१-२२: आयोजन – नियोजन आणि सादरीकरणाचे लक्षवेधी कार्य:</u>** हीरक महोत्सवाचे देखणे आयोजन, सुनियोजित आखणी आणि आकर्षक सादरीकरणाचे लक्षवेधी कार्य हीरक महोत्सव समिती अध्यक्ष श्री. बळवंतराव राणे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी, उत्तमरित्या पार पाडले. हीरक महोत्सवानिमित्त शालेय स्तरावर नेमलेल्या व्याख्यान आयोजन समिती, प्रसिध्दी विभाग समिती, क्रीडा समिती, स्मरणिका समिती, अल्पोपहार-भोजन समिती, स्पर्धा आयोजन समिती, परिसर सुशोभिकरण समिती, आतिथ्य समिती, कार्यक्रम नियोजन समिती, रंगरंगोटी समिती, निमंत्रण समिती, स्वयंसेवक समिती आणि सत्कार समिती या सर्व समित्यांनी मुख्याध्यापक श्री.दिलीप तुकाराम घरपणकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम कार्य पार पाडले. सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने आणि समरसून काम केल्याने हीरक महोत्सव सोहळा आनंदी आणि उत्साही वातावरणात पार पडला. खास करुन सहाय्यक शिक्षक श्री. पाडावे सरांच्या मार्गदर्शनाखाली हीरक महोत्सवाच्या दोनही दिवशी प्रशालेच्या विध्यार्थीनींनी स्वागत गीत आणि सरस्वती वंदना उत्कृष्टपणे सादर केले.

कार्यकारी समिती, हीरक महोत्सव सांगता सोहळा नेत्रदिपक होण्यासाठी वर्षभर सहभागी होत हातभार लावणाऱ्या संस्थेतील आणि संस्थेबाहेरील सर्व मान्यवरांचे, कंत्राटदारांचे, विविध सेवा पुरवठादारांचे, सभामंडप, डेकोरेशन, महापूजा व्यवस्थापन, भोजन, अल्पोपहारादी सर्व व्यवस्थापन चोख पाडणाऱ्या सर्वांचे आदरपूर्वक आभार मानत आहे. या सोहळ्यासाठी अहोरात्र झटणारे आमचे

मुख्य कार्यवाह श्री. सुभाषचंद्र परांजपे, उपाध्यक्ष श्री. शिवाजी राणे, उपाध्यक्ष श्री. धनंजय परांजपे, कोषाध्यक्ष श्री. संजय टाकळे, सहकार्यवाह श्री. रघुनाथ पाळेकर, सहकोषाध्यक्ष डॉ. विनय केळकर, सदस्या सौ. गीता सोवनी, सदस्या सौ. अमृता परांजपे आणि सदस्य श्री. अरविंद ठाकूरदेसाई यांच्या हीरक महोत्सव सहभाग कार्याची प्रशंसा करावी ती थोडीच आहे. या ज्ञापनाद्वारे हीरक महोत्सव महासोहळा संस्मरणीय करण्यासाठी सर्व कार्यक्रमांना उपस्थिती नोंदवून तो यशस्वी करण्यात हातभार लावलेले सर्व सन्माननीय पाहुणे, सन्माननीय देणगीदार, जाहिरातदार, हितचिंतक, माजी विध्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विध्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि सर्व स्नेहीजनांचे कार्यकारी समिती मन:पूर्वक आभार मानत आहे. याचबरोबर पुढील वाटचालीत, अखंड उपक्रमशीलतेचा वारसा असाच कायम राखू असे ठामपणे सांगत हीरक महोत्सवी समारोपाचे वार्तांकन पूर्ण करतो.

**मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. विश्वासराव रामचंद्र पाळेकर<br>अध्यक्ष | श्री. विनायक कृष्णाजी लेले<br>कार्याध्यक्ष | श्री. सुभाषचंद्र गणेश परांजपे<br>मुख्य कार्यवाह | श्री. संजय राजाराम टाकळे<br>कोषाध्यक्ष |

**मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ**

31 मार्च 2023 रोजीचे ताळेबंद पत्रक

| **निधी व देणी** | **2022-23**<br>**रु. पै.** | **मालमत्ता व येणी** | **2022-23**<br>**रु. पै.** |
|---|---|---|---|
| **संस्था निधी सामान्य निधी**<br>(As per Schedule K) | 66,95,048.19 | **स्थावर मालमत्ता**<br>(As per Schedule D) | 83,42,815.85 |
| **अन्य वर्गीकृत निधी**<br>(As per Schedule L) | 1,24,85,513.99 | **जंगम मालमत्ता**<br>(As per Schedule E) | 23,99,221.15 |
| **घसारा निधी**<br>(As per Schedule D & E ) | 33,12,030.37 | **गुंतवणुका** | 0 |
| **देणी**<br>(As per Schedule M) | 3,34,671.00 | **जमा येणी आणि देणी**<br>(As per Schedule N) | 2,62,854.50 |
| **उत्पन्न-खर्च खात्याचा निष्कर्ष**<br>मागील ताळेबंदाप्रमाणे: 522710.86<br>वजा<br>उत्पन्न-खर्च खात्यातील<br>चालू वर्षाची तूट: 490837.30 | 31,873.56 | **रोख व बँक शिल्लक**<br>(As per Schedule O) | 1,18,54,245.61 |
| **एकूण** | 2,28,59,137.11 | **एकूण** | 2,28,59,137.11 |

मुंबई- ता. मे.परांजपे अँड असोशिएटस

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता

सही/- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊटंट

सही/- सं.द.टाकळे
कोषाध्यक्ष

सही/- वि.रा.पाळेकर
अध्यक्ष

**मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ**

31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षांचा उत्पन्न व खर्च खात्याचा सारांश

| **खर्च** | **2022-23**<br>**रु. पै.** | **उत्पन्न** | **2022-23**<br>**रु. पै.** |
|---|---|---|---|
| **मालमत्तेविषयी खर्च**<br>**(As per Schedule A)** | 3,14,385.00 | **इमारत भाडे** | 24,588.00 |
| | | **व्याज**<br>**(As per Schedule F)** | 5,55,042.41 |
| **आस्थापन खर्च**<br>**(As per Schedule B)** | 4,91,535.50 | | |
| | | **देणग्या**<br>**(As per Schedule G)** | 12,39,102.00 |
| **आयव्यय निरीक्षकांची बिदागी अंशदान आणि फी** | 11,000.00 | | |
| | | **सरकारी अनुदाने वेतन व वेतनेतर**<br>**(As per Schedule H)** | 1,38,07,308.00 |
| **घसारा**<br>**(As per Schedule D & E)** | 3,25,046.00 | | |
| | | **अन्य मार्गाने जमा**<br>**(As per Schedule I)** | 35,806.00 |
| **उद्देश्यांप्रित्यर्थ खर्च (शैक्षणिक)**<br>**(As per Schedule C)** | 1,46,04,429.80 | **फी,टर्म फी व अन्य फी**<br>**(As per Schedule J)** | 20,592.00 |
| **संस्था निधींकडे वर्ग केलेल्या रकमा** | 4,26,883.41 | **घसारा** | 4,90,837.30 |
| **एकूण** | 1,61,73,275.71 | **एकूण** | 1,61,73,275.71 |

मुंबई- ता. मे.परांजपे अँड असोशिएटस

मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाकरिता

सही/- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊटंट

सही/- सं,द,टाकळे
कोषाध्यक्ष

सही/- वि.रा.पाळेकर
अध्यक्ष

## मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ

डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलचा 01.04.2022 ते 31.03.2023 या वर्षांचा जमाखर्चाचा सारांश

| उत्पन्न | 2022-23<br>रु. पै. | खर्च | 2022-23<br>रु. पै. |
|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक**<br>मुख्याध्यापकांकडे : 1096.50<br>SDCC BANK KASARDE : 70839.32<br>SBI DEOGAD : 68901.99<br>VKGBK : 1887.30<br>SDCCBK : 9862.00 | 1,52,587.11 | **पगार**<br>शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी: | 1,35,66,848.00 |
| | | **इमारत भाडे** | 24,588.00 |
| | | **वेतनेतर अनुदानावरील खर्च 30** % | 72,328.00 |
| **सरकारी अनुदाने**<br>वेतन अनुदान :13392200.00<br>NPS GRANT : 174648.00 | 1,35,66,848.00 | **वेतनेतर अनुदानावरील खर्च**<br>70 % | 13,405.00 |
| | | **वेतन कपाती** | 52,52,482.00 |
| **वेतनेतर अनुदान** | 80,000.00 | **अनावर्ती खर्च** | 86,997.00 |
| **अन्य जमा**<br>बँक खत्यातील व्याज | 1,081.00 | **कर्ज आणि उचल परतफेड** | 1,15,000.00 |
| **विध्यार्थी फी जमा**<br>शैक्षणिक फी :2748.00<br>प्रवेश फी : 24.00<br>शाळा सोडण्याचा दाखला : 82.00 | 2,854.00 | **खात्या खात्याअंतर्गत वर्ग** | 5,000.00 |
| | | **देय वेतन** | 70,826.00 |
| वेतनातील कपात<br>भ.नि.निधी :996000.00<br>व्यवसाय कर :35000.00<br>सोसायटी :2743790.00<br>विमा :295483.00<br>आयकर :1057300.00<br>NPS :124741.00<br>रेव्हुन्यु स्टॅंप : 168.00 | 52,52,482.00 | **वर्ष अखेरची शिल्लक**<br>रोख : 3545.50<br>SDCCBKK'RDE :3,34,500.32<br>SBI DEVGAD :34,607.99<br>VKGR BK :2,666.30<br>SDCCBMANCHE :10,042.00 | 3,85,362.11 |
| **अनावर्ती जमा** | 86,997.00 | | |
| **कर्ज आणि उचल परतफेड**<br>मु.पं.शि.प्र.मंडळ | 1,15,500.00 | | |
| **देय वेतन**<br>सेवानिवृत्त | 3,34,487.00 | | |
| **एकूण** | **1,05,92,836.11** | **एकूण** | **1,05,92,836.11** |

मुटाट- ता. मे.परांजपे अँड असोशिएटस

डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूलकरिता

सही- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊटंट

सही- दि.तु.घरपणकर

मुख्याध्यापक

**मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ**

कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाचा 01.04.2022 ते 31.03.2023 या वर्षाचा जमा-खर्चाचा सारांश

| **उत्पन्न** | **2022-23**<br>**रु. पै.** | **खर्च** | **2022-23**<br>**रु. पै.** |
|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** : 1,075.00 | 61,953.80 | **पगार** | 3,80,500.00 |
| अनुसुची A प्रमाणे : 60,878.80 | | शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी: | |
| | | | 16,906.80 |
| | | **शैक्षणिक खर्च** | |
| | | लेखापरीक्षक मानधन : 8,800.00 | |
| मंडळाकडून कर्ज आणि उसनवार | 3,80,500.00 | छपाई : 1700.00 | |
| | | झेरॉक्स आणि टपाल : 85.00 | |
| **जमा फी** | 17,354.00 | स्टेशनरी : 390.00 | |
| शैक्षणिक फी : 14,496.00 | | HSC Registrstion : 1,000.00 | |
| प्रवेश फी, : 272.00 | | HSC TADA : 1,040.00 | |
| टर्म फी : 2,416.00 | | ST WORK TADA : 350.00 | |
| **वाचनालय फी : 170.00** | | संकिर्ण खर्च : 1,411.00 | |
| | | प्रवास खर्च : 1,130.00 | |
| | | वर्तमान पत्रे : 500.00 | |
| **अन्य जमा** | 17,910.00 | कार्योत्सव : 500.00 | 17,910.00 |
| बारावी परीक्षा फी : 17,550.00 | | | |
| | | **अनावर्ती खर्च संकीर्ण खर्च** | |
| क्रिडा मुल्यांकन : 360.00 | | बारावी परीक्षा फी : 17550.00 | |
| | | क्रिडा मुल्यांकन : 360.00 | 64,233.00 |
| | | **वर्ष अखेरची शिल्लक** | |
| | | प्राचार्य/मुख्याध्यापकांकडेरोख : 199.00 | |
| | | विदर्भ कोकण ग्रामिण बँक : 64,034.00 | |
| **एकूण** | 4,79,549.80 | **एकूण** | 4,79,549.80 |

मुटाट- ता. मे.परांजपे अँड असोशिएटस ,तळेरे

सही- भागीदार श्री सुधाकर जयंत परांजपे, चार्टर्ड अकाऊटंट

कै.सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालयाकरिता

सही- दि.तु.घरपणकर
प्राचार्य/मुख्याध्यापक

**डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल, मुटाट आणि कै.भाऊसाहेब काळे भागशाळा, मणचे**
**मुख्याध्यापक/प्राचार्य शिक्षक आणि कर्मचारी वर्ग : सन २०२२-२३**

| नाव | हुद्दा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| श्री. दिलीप तुकाराम घरपणकर | प्राचार्य-मुख्याध्यापक | बी.ए.बी.एड. |
| श्री. अनिल देविदास घुगे | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| सौ.मृणाल रामदास कोयंडे | सहाय्यक शिक्षिका | बी.ए.बी.एड. |
| श्री. रमेश न्हानू कविटकर | सहाय्यक शिक्षक | बी.एस्सी..बी.एड. |
| सौ.मृणाली मंगेश मळये | सहाय्यक शिक्षिका | बी.ए.बी.पी.एड. |
| श्री. उदय गोपाळ कदम | सहाय्यक शिक्षक | एम.ए.डी.एड. |
| श्री. निलेश गोविंद तांबे | सहाय्यक शिक्षक | एच.एस.सी.डी.एड. |
| श्री. तन्मय सदानंद कोठावळे | सहाय्यक शिक्षक | बी. एस्सी. बी. एड. |
| श्री. अशोक बाळवंत देसाई | सहाय्यक शिक्षक | बी.ए.बी.पी.एड. |
| श्री. केशव सुभाषचंद्र परांजपे | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| सौ. गीतांजली अशोक देसाई | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| श्री. चेतन रघुनाथ पाळेकर | आय.सी.टी.निर्देशक | बी.कॉम |
| श्री. संजय नारायण धुपकर | कनिष्ठ लिपिक | बी.कॉम |
| श्री. अरुण धोंडू साळुंके | नाईक | १० वी |
| श्री. विजय विश्वनाथ ठाकूरदेसाई | शिपाई | ९ वी |
| श्री. प्रविण जनार्दन झोरे | शिपाई | ९ वी |
| श्री. लक्ष्मण बाळकृष्ण घाडी | शिपाई | १२ वी |

**कै. सौ.जानकी शिवराम राणे कला व वाणिज्य (सं) कनिष्ठ महाविद्यालय, मुटाट**
**संस्था नियुक्त शिक्षक सन 2022-23**

| | | |
|---|---|---|
| श्री. शैलेश कृष्णा पाडावे | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| श्री. अजित न्हानु कविटकर | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड. |
| कु. निशा विजय पाळेकर | सहाय्यक शिक्षिका | एम.ए.बी.एड. |
| कु. प्रणाली सुरेश रायकर | सहाय्यक शिक्षिका | बी.कॉम.बी.एड. |

**पुस्त प्रेष्य**

प्रति

श्री/श्रीमती ------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

प्रेषक:
मुख्य कार्यवाह : श्री. सुभाषचंद्र गणेश परांजपे,
मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ,
डॉ.श्रीधर रघुनाथ लेले हायस्कूल,
डॉ.श्रीम.हेमलता माधव पुरंदरे (लेले) विद्यासंकुल,
मु.पो.मुटाट,ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग:पिन 416803.

प्रेषक:
कार्याध्यक्ष: श्री. विनायक कृष्णाजी लेले,
मुटाट पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ,
स्वाती, ब, अमृतकुंभ सोसायटी,
चितळे पथ, दादर, मुंबई 400028.